# क्रिकेटसूर्य सुनील गावस्कर
## पोवाडा
शाहीर प्रभाकर जामखेडकर, मुंबई

विक्रमी शतकवीर थोर। सुनील मनोहर। हिरा कोहिनूर।
विक्रमांचा रचला ज्याने डोंगर। भारताची मान राखली वर।
प्रभाकर 'सुनील गुण' गाणार ॥ धृ.॥

पोराचे पाय पाळण्यात। दिसती शाळेत। क्रिकेट खेळण्यात।
सेंट झेवियर हायस्कूलात। फादर फ्रिटझ खेळ शिकवतात।
त्यांचा उपदेश सदोदीत॥

चाल: पल्लेदार चेंडू अडवावा। बिन पल्लेदार बडवावा॥
सुनील मधला क्रिकेटर जागा। उपदेश पूर्ण बिंबाविला॥
सारे चित्त करी एकाग्र। तपश्चर्या चालली उग्र॥
जसा एकलव्य आधुनिक। ध्येयाकडे लक्ष केंद्रीत॥
धावांचा लागला ध्यास। फळ आले तपश्चर्येस॥
निरीक्षण शक्तीवर भर। मेहनत करी जोरदार॥
शैली होऊ लागली तय्यार। बारकावे नजर टिपणार॥

चाल: कूच-बिहार ट्रॉफीमध्ये सुनील प्रथम चमकला॥
तेव्हापासून धावांचा रतीब सुरू ज्याहला॥
सर्वोत्कृष्ट विद्यार्थी क्रिकेटर गाजला॥
आंतरकूच कॉलेजात चमक दावू लागला॥

चाल: एके दिवशी सुनील पोहचला मामांच्या घरी।
मामा दंग कपाट लावण्यात साफसूफ करी।
स्वेटरांची थप्पी लागलेली खालीवर करी।
टकमक सुनील न्याहाळी। न्याहाळी, पडला मग गळी।
लाडे लाडे म्हणाला एक द्याल का तरी॥
नानामामा नाना स्वेटर मिळविले तुम्ही।
एक दिला तर पराक्रम गाजवू आम्ही।
नानामामा म्हणाला ऐक ध्यान देवूनी।
ही मानचिन्ह देशाची। देशाची, अभिमानाची।
उसनी घेवून अंगावर नसती चढवायाची॥
स्वपराक्रमाने असती जिंकायाची॥

चाल: तत्क्षणी केला निर्धार। मीही करणार। पराक्रम थोर।
मानचिन्ह माझ मीच मिळवीन। मामांसारखे
खेटर मीही जिंकीन। स्वर्ग कसा दिसे मेल्यावीण।

चाल: उगवता सूर्य हळू हळू तळपू लागला ॥
७१ साल उजाडता भाग्योदय झाला ॥
वेस्ट इंडिज मालिकेत फलदांज सलामिला ॥
भीम पराक्रम दाविला दूसऱ्या टेस्टला ॥
वेस्ट इंडिज भूमीवर चमत्कार जणू केला।
भारताने पहिल्यांदा विजय तिथे नोंदला ॥
सुनिलचा सिंहाचा वाटा बघा यातला ॥
शंभर आणि दोनशे धावा त्रिनिदादला ॥
७७४ विक्रमी धावा मालिकेला ॥
आजपर्यंत कुणी नाही धक्का त्याला लावला ॥

चाल: विजयाची चढती कमान। सुरू येथून। मागे नाही पहाण।
भारताचा होईन ब्रॅडमन। निश्चय केला मनोमन।
प्रयत्नांती परमेश्वर जाण ॥

चाल: सलामीचा फलंदांज खेळतो, वामनमूर्ती डौलात।
नभांगणी जणू सूर्य चमकतो, चेंडू फटकितो शैलीत ॥
धनुर्धारी अर्जून जणू हा, लक्ष पूरेपूर चेंडूवर।
काकदृष्टिने अचूक हेरून, शिस्तित फटका मारणार ॥

चाल: सुनिल मैदानात जवा येत।
दोन गोष्टी फक्त घडतात।
नवा विक्रम होत निर्माण।
किंवा जूना निघतो मोडीत।
विक्रमांचा बादशहा, विक्रमसिंह शोभत ॥

चाल: ऑस्ट्रेलियाचा डॉन ब्रॅडमन महान खेळाडू जगताला।
पस्तिस वर्षापूर्वी विक्रम केला, एकोणतीस हो शतकांचा ॥
डॉन तुम्ही हे कस साधल, सांगातरी हो आम्हाला।
महान खेळाडू, महान उत्तर, ध्याव तुम्ही ध्यानाला ॥
प्रत्येक चेंडू पहिला बॉल मज, हळूच सांगे गुपिताला।
सदा सर्वदा हीच कल्पना, कुणीही धाडील तंबूला ॥

चाल: सुनीलचा ऐका पराक्रम।
घडाघड मोडी विक्रम।
बी. बी. मामा लावतो क्रम।
आम्हा ठाव नाही अनुक्रम।
ब्रॅडमनची बरोबरी केली दिल्लीला त्यान ॥

चाल: सुनीलचा सुदिन उगवला। ८३ सालाला। मद्रास शहराला
तीसाव शतक नोंदविल। ब्रॅडमनपुढे केली दौड।
विक्रमाची सुरू घोडदौड ॥

चाल: ऐका फक्त विश्व विक्रम। छोट्या उस्तादाचा पराक्रम ॥
सर्वाधिक वैयक्तिक धाव। आठ हजार तीनशे चौऱ्याण्णव ॥
५०+ धावांचा गुण। ६६ वेळा स्थापिलो त्यान ॥

चाल: आनंदी आनंद जाहला।
हर्ष माता पिता मामाला।
पुत्र हवा ऐसा मातेला।
किर्तीचा झेंडा फडकला।
बक्षिसांचा पूर लोटला।
अभिमान भाच्याचा पुरेपूर मामाला ॥
डॉन ब्रॅडमन आनंदला।
भरघोस स्तुती सुनीलला।
'सनी' महान खेळाडू झाला।
खेळाच ताईत शोभला।
भूषण साऱ्या जगताला।
आनंदाचे फटाके उडले साऱ्या देशाला ॥

चाल: भारत खाण रत्नांची। साधुसंतांची। शूर विरांची।
परंपरा राखली आज त्यान। 'सनी'च्या विश्व विक्रमान।
देशाची ताठ झाली मान ॥
विश्व पराक्रमी वीरांचे। गावे पोवाडे। किर्ती चौघडे।
"छोट्या उस्तादा"च अभिनंदन। क्रिकेट सूर्याला केल वंदन।
देशाच व्यक्त केल मन ॥

मुंबई ४०००५१
१०-२-१९८४